116

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

---

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २२/०८/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. वितंप्र- ३६१८/ प्र. क्र. ८७ / पोल-३, दिनांक १८ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीस केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन आदेश क्र. वितंप्र- ३६१८/ प्र. क्र. ८७/ पोल-३, दिनांक १८ ऑगस्ट, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०८१८१७२०१७६२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त विभाग" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीस केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वितंप्र -३६१८/प्र.क्र.८७/पोल-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, २ रा मजला, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ ऑगस्ट, २०२३

<u>वाचा:</u>

१. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH),दि.०१.०७.२०१४, दि.१९.०७.२०१७, दि.०९.१०.२०१७, दि.२०.०३.२०१८, दि.०९.०५.२०१९ व दि.२४.४.२०२३
२. शासन निर्णय, गृह विभाग क्र. गृहआ-२०१५/प्र.क्र.२३०/आस्थापना-२, दि.२०.०५.२०१५.
३. गृह विभाग, पत्र क्रमांक: सीसीटी ३६१३/प्र.क्र.१४०/भाग-१/पोल-३, दि.०५.११.२०१६.
४. गृह विभाग, पत्र क्रमांक: सीसीटी ३६१६/प्र.क्र.१४०/भाग-१/पोल-३, दि.०६.०१.२०१७, दि.२७.१०.२०१७ व दि.३०.०३.२०१९.
५. शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक: सीसीटी ३६१६/प्र.क्र.१४०/भाग-१/ पोल-३, दि.२०.१२.२०२१ व दि.१६.०३.२०२२
६. शासन कार्यादेश क्र.सीसीटी ३६२०/प्र.क्र.०४/भाग-१/पोल-३, दि.०१.०८.२०२२
७. शासन नियुक्ती पत्र क्र.सीसीटी ३६२०/प्र.क्र.०४/भाग-१/पोल-३, दि.१७.१०.२०२२
८. शासन निर्णय क्र. वितंप्र-३६१८/प्र.क्र.८७/पोल-३, दि.२८.३.२०२३
९. मे. अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीची दि.२४.४.२०२३ चे देयक.
१०. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/MERS (डायल-११२)/८१/२०१७-२१, दि.७.६.२०२३
११. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.१२.४.२०२३.
१२. शासन निर्णय क्र. सीसीटी-३६१६/प्रक १४०/भाग-१/पोल-३,दि. २३.६.२०२३.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा उपलब्ध करून देण्याकरीता राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीची दि.५.११.२०१६ च्या पत्रान्वये नियुक्ती करण्यात आली असून सदर कंपनीस दि.०६.०१.२०१७ च्या पत्रान्वये कार्यादेश देण्यात आले. तसेच दि.२७.१०.२०१७ व दि.३०.०३.२०१९ च्या पत्रान्वये सदर कंपनीस सुधारीत कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर दि.२०.१२.२०२१ च्या शासन निर्णयान्वये अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीच्या एका वरिष्ठ सल्लागारास दि.१६.०५.२०२० ते दि.३१.०३.२०२१ पर्यंत दरमहिना-दरमाणुस (Man-Month) तत्वानुसार मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर

मे. अर्नेस्ट अँड यंग या कंपनीच्या १७ man-months (१० वरिष्ठ सल्लागार व ७ सल्लागार) सल्लागारांना दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ पर्यंत दरमहिना-दरमाणुस (Man-Month) तत्वानुसार मुदतवाढ देण्यात आली होती.

तसेच डायल-११२ प्रकल्पासाठी सल्लागारांना मुदतवाढ देण्यामध्ये खंड पडला असल्याकारणाने संदर्भ क्र.६ येथील शासन पत्रान्वये प्रकल्प सल्लागार मे. अर्नेस्ट ॲन्ड यंग कंपनी यांना कार्यादेश देण्यात आले व संदर्भ क्र.७ येथील दिनांक १७.१०.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये मे. अर्नेस्ट ॲन्ड यंग कंपनीच्या एका वरिष्ठ सल्लागारास ६ Man-Month तत्वावर नियुक्ती देण्यात आली, संदर्भ क्र.८ येथील दिनांक २८.३.२०२३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ८.१.२०२३ पर्यंतचे देयक अदा करण्यात आले आहे. तद्नंतर शासन निर्णय, गृह विभाग दिनांक २३.६.२०२३ अन्वये मे. अर्नेस्ट अँड यंग कंपनीच्या एक वरिष्ठ सल्लागारास दरमहिना- दरमाणूस (Man-Months) दिनांक १.२.२०२३ ते दिनांक ३०.६.२०२३ या पाच महिन्यांसाठी (५ Man-Months) तसेच एक मुख्य सल्लागारास दिनांक १.५.२०२३ ते दिनांक ३०.६.२०२३ या दोन महिन्यांसाठी (२ Man-Months) दरमहिना-दरमाणूस (Man-Months) तत्वानुसार मुदतवाढ देण्यात आली.

सदर प्रकल्पासाठी मे. अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीला माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार प्रतिव्यक्ती-प्रतिमहा (Man-Month) तत्वावर मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर कंपनीने उपरोक्त प्रकल्पासंदर्भात (Project Monitoring Support Post Go-Live) दि.९.१.२०२३ ते दि.८.२.२०२३ या कालावधीसाठी पाहिलेल्या कामाची देयके अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पासाठी मे. अर्नेस्ट अँड यंग या सल्लागार कंपनीची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय दि.०९.०५.२०१९ अन्वये निश्चित केल्यानुसार त्यांना मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुसार मे. अर्नेस्ट अँड यंग कंपनीला राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणुन Project Monitoring Support Post Go-Live करीता दि.९.१.२०२३ ते दि.८.२.२०२३ या कालावधीसाठी रु.३,२७,०९६/- (रुपये तीन लाख सत्तावीस हजार शहाण्णव फक्त) इतक्या रकमेची देयके अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणुन Project Monitoring Support Post Go-Live करीता मे. अर्नेस्ट अँड यंग कंपनीने पाहीलेल्या कामासाठीच्या रु.३,२७,०९६/- (रुपये तीन लाख सत्तावीस हजार शहाण्णव फक्त) इतक्या रकमेच्या देयकाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| Sr. No | Invoice No. for Total Duration | Milestone | Resource Name | Desig-nation | Dura-tion (Man - Month) | Man Month rate as per GoM GR dated 9-5-2019 | Deployment (Percen-tage) | Applicable Amount per Resource | Total applicable amount | OPE Claimed | CGST @ 9% | SGST @ 9% | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | B | c | D | E | F | G | H | I = G*H | J | K | L | M | N=J+L+M |
| 1 | (Project Monitoring Support Post Go-Live)9th January 2023 to 8th February 2023 | Project Monitoring Support Post Go-Live | Abhishek Desai | Senior Consultant | 1 | 2,77,200 | 100 % | 2,77,200 | 100% | 0 | 24948 | 24948 | 3,27,096 |
| Total | | | | | | | | | | | | | **3,27,096** |

**टीप:-**

अ) उपरोक्त देयक या संदर्भात नमुद शासन निर्णय संदर्भ क्र.१ मध्ये नमुद केल्यानुसार सदर प्रकल्पासाठी सल्लागारांना दरमहिना दरमाणुस (Man-Month) तत्वानुसार अदा करण्यात येत आहे.

ब) शासन निर्णय संदर्भ क्र.१ नुसार सल्लागारांना प्रकल्पावर होणाऱ्या खर्चाच्या ५% च्या प्रमाणात प्रवास, भोजन व निवास इ. खर्च अनुज्ञेय करण्यात आला आहे.

क) संदर्भ क्र.९ अन्वये मे. अर्नेस्ट अँड यंग कंपनीने सादर केलेल्या देयकानुसार सदर रकमा अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर रकमांमध्ये १८% वस्तू आणि सेवा कर समाविष्ट करण्यात आला आहे.

ड) सदर प्रकल्पासाठी संबधित कंपनीला सल्लागारांच्या मानधनापोटी जादा रक्कम अदा केली आहे असे निदर्शनास आल्यास सदर जादा रक्कम संबधित कंपनीकडून समायोजीत करण्याचा अधिकार शासनास राहील.

इ) सदर देयके आयकर व इतर कर वजाती करून अदा करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी येणारा खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस (००) ११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण, (०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प, (०१) (०१) तंत्रज्ञान विकास प्रकल्प (२०५५ए०३२), १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखाली टाकून तो सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२.४.२०२३ अनुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८१८१७२०१७६२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUPALI SANJOG KABARE

Digitally signed by RUPALI SANJOG KABARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=825ec39543f0d33deccec30f6ca54b1adc43044 3efec55f07e98dc173423779d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CB43A03D973FF96AABBF02A74864A4 681399FE663D8FBDE0441A596BEB3ACDD, cn=RUPALI SANJOG KABARE
Date: 2023.08.18 17:21:59 +05'30'

**( रुपाली कबरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
८. मे. अर्नेस्ट अँड यंग कंपनी, १४ वा मजला,द रुबी, २९, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई- २८.
९. वित्त विभाग-व्यय-७, मंत्रालय, मुंबई.
१०. अर्थ-१ शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती / पोल-३